RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक १३३(४)] शुक्रवार, सप्टेंबर २०, २०१९/भाद्र २९, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३७३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० सप्टेंबर २०१९

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१८/अनौ. ३९/प्र.क्र. ३६४/म-१(धोरण).—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, गृह निर्माण विभाग, शासन निर्णय क्रमांक धापुप्र-२०१८/प्र.क्र. ९०/झोपसु, दिनांक ५ नोव्हेंबर २०१८ (ज्याचा उल्लेख यात यापुढे "उक्त शासन निर्णय" असा करण्यात आला आहे) याद्वारे धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर्स १ ते ५ या सर्व सेक्टरचा विशेष हेतू कंपनी (एसपीव्ही) च्या माध्यमातुन एकत्रित विकास करण्याबाबत आणि विशेष अधिकार प्रदान करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९८५ चा ६०) (ज्याचा उल्लेख यात यापुढे "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, लोकहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची राज्य शासनाची खात्री पटल्यामुळे महाराष्ट्र शासन, धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर्स १ ते ५ या सर्व सेक्टरचा विशेष हेतू कंपनी (एसपीव्ही) च्या माध्यमातून एकत्रित विकास करण्याशी संबंधित आणि सदर आदेशास जोडलेल्या अनुसूचीमध्ये उल्लेखित केलेल्या सलेखांवर आकारणी योग्य आसलेले संपूर्ण मुद्रांक शुल्क, खालील नमूद अटी तथा शर्तीच्या अधीन राहून माफ करीत आहेः-

**अट तथा शर्त—**

विशेष हेतू कंपनी किंवा धारावी पुनर्विकास प्रकल्पातील सेक्टर्स १ ते ५ या सर्व सेक्टर्सचा एकत्रित विकास करण्याकरिताचे विकासक ज्यांनी सदर आदेशाखाली मुद्रांक शुल्क माफीचा लाभ घेतलेला आहे, परंतु त्यांनी उक्त शासन निर्णयाचे प्रयोजन किंवा उद्दिष्टे, यांची पूर्तता करण्यात कसूर केल्यास, सदर आदेशास जोडलेल्या अनुसूचीच्या अनुक्रमांक १, ३ आणि ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखावर जणूकाही सुरवातीपासुनच त्यांना मुद्रांक शुल्कामध्ये माफी देण्यात आली नाही, असे समजून तथा गृहित धरुन, ते संपूर्ण मुद्रांक शुल्क व दंड तथा शास्ती लागु असल्यास, भरण्यास पात्र असतील.

**अनुसूची**

| अ.क्र. (१) | संलेखाचा प्रकार (२) | ज्या पक्षकारांदरम्यान संलेख निष्पादित होणार आहे ते (३) | महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची एक मधील अनुच्छेद (४) |
|---|---|---|---|
| १ | विकसन/विकास करार आणि विकास हक्कांचे हस्तांतरण. | धारावी पुनर्विकास प्रकल्प/ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि विशेष हेतू कंपनी. | अनुच्छेद ५ (जी-ए) |
| २ | अधिसूचीत धारावी क्षेत्रामधील निवासी किंवा व्यवसायीक युनिट तथा घटकाची पहिली विक्री करण्यासाठी करण्यात येणारा विक्रीसंबंधीचा करारनामा. | विशेष हेतू कंपनी आणि असे घटक खरेदीकर्ता तथा खरेदीदार. | अनुच्छेद २५ (बी) |
| ३ | अधिसूचीत धारावी क्षेत्रामध्ये स्थित कोणत्याही स्थावर मिळकतीच्या पहिल्या विक्रीकरिता करण्यात येणारे अभिहस्तांतरणपत्र. | विशेष हेतू कंपनी आणि अशा स्थावर मालमत्तेचा खरेदीकर्ता तथा खरेदीदार. | अनुच्छेद २५ (बी) |
| ४ | अधिसूचीत धारावी क्षेत्रामध्ये स्थित जमिनीचे धारावी पुनर्विकास प्रकल्पाकरिता भूसंपादन करण्याच्या उद्देशाने आणि संक्रमण शिबीरांकरिता करावयाच्या भुसंपादनासाठी करण्यात येणारे अभिहस्तांतरणपत्र. | धारावी पुनर्विकास प्रकल्प/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण किंवा विशेष हेतू कंपनी आणि अशा जमिनीचे मालक. | अनुच्छेद २५ (बी) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**

कार्यासन अधिकारी.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mumbai 400 032, dated the 20th September 2019

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2018/UOR. 39/C.R. No. 364/M-1(Dhoran).—Whereas, Government of Maharashtra has, *vide* Government Resolution, Housing Department, No. DHAPUPRA-2018/C.R.90/ZOPASU, dated the 5th November 2018, (hereinafter referred to as " the said Government Resolution") decided to delegate special powers and to do the integrated development of Sectors 1 to 5 of the Dharavi Rehabilitation Scheme through Special Purpose Vehicle (SPV) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty in whole chargeable on the instruments specified in the Schedule appended hereto, in respect of the integrated development of Sectors 1 to 5 of the Dharavi Rehabilitation Scheme through Special Purpose Vehicle (SPV), subject to the following condition, namely :—

**Condition—**

The Special Purpose Vehicle or any Developer of the integrated development of Sectors 1 to 5 of the Dharavi Rehabilitation Scheme who has availed of the remission in stamp duty under this Order but who fails to fulfil the purpose of " the said Government Resolution" shall be liable to pay the stamp duty and penalty, if any, on the instruments as specified at in Sr. No. 1, 3 and 4 of the Schedule appended hereto, as if, there was no remission in stamp duty from the beginning.

*Schedule*

| Sr. No. | Type of Instruments | Parties between whom the instrument is being executed | Articles of Schedule I of the Maharashtra Stamp Act. |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Development Agreement and Assignment of Development Rights. | Dharavi Rehabilitation Project / Slum Rehabilitation Authority and the Special Purpose Vehicle. | Article 5 (g-a) |
| 2 | Agreement to sell for first sale of residential or commercial units within the notified Dharavi area. | The Special Purpose Vehicle and the purchaser of such unit. | Article 25 (b) |
| 3 | Conveyance of first sell of any immovable property situated within the notified Dharavi area. | The Special Purpose Vehicle and the purchaser of such immovable property. | Article 25 (b) |

*Schedule*

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| 4 | Conveyance executed for the purposes of land acquisition for Dharavi Rehabilitation Project situated within the notified Dharavi area, and the land acquisition for the transit camps. | Dharavi Rehabilitation Project / Slum Rehabilitation Authority or the Special Purpose Vehicle and Land Owner. | Article 25 (b) |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Desk Officer.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.